विशेष दिवाणी दावा क्र.०९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
**प्रतिवादी क्रं. १ ते ५ तर्फे सा.क्र.१**
**(नि.क्र.४०७)**



**वादी तर्फे उर्वरीत उलटतपास श्री. व्ही.एस.शेळके, वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**५३.** स.क्र.५, ६, ८ आणि ९ यांची लांबी दक्षिण-उत्तर आहे. सदर जमिनी या सांडव्यासाठी संपादीत झाल्या. मी सांगतो की, काही जमीन धरणाच्या भिंतीसाठी संपादीत झाली. भूमी अभिलेखच्या नकाशात या जमिनींची लांबी दक्षिण-उत्तर न दाखवता पुर्व-पश्चिम दाखवली आहे, याबद्दल मला माहिती नाही. संपादन करताना या जमिनीची मोजणी २००५ साली जी.जी.बोंडगे, भूमी अभिलेख अधिकारी यांनी केली.

**५४.** स.क्र.७०/१/१, ८/१/१, ८/१/२, ९/२, ५/१ आणि ६/१ या जमिनींच्या सरतपासात लिहिलेल्या चतु:सीमा फेरफार क्र.३५६ प्रमाणे लिहिलेल्या नाहीत यास माझे सांगणे की, फेरफारमध्ये त्याच्याबद्दल उल्लेख नाही. या चतु:सीमा दाखविणारा कागदोपत्री पुरावा या प्रकरणात दाखल नाही, हे खरे आहे. या चतु:सीमा लिहिण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री आधार नाही, हे म्हणणे खरे नाही. फेरफार क्र.३५६ मध्ये माझया एकटयाच्या हिश्शाला जी जमीन दाखवली, तिच्या चतु:सीमा मला सांगता येतात. स.क्र.६ मध्ये माझ्या हिश्शाला जमीन आलेली नाही. भाग्यशाला संभाजी देपे यांना स.क्र.६ मध्ये असलेल्या जमिनीच्या चतु:सीमा मला सांगता येतात. भाग्यशालाच्या स.क्र.६ मधील हिश्शाच्या पुर्वेला- वर्षा गंगाधर देपे यांनी खरेदी केलेली स.क्र.६/२ व ६/३ मधील जमीन, पश्चिमेला- हंगेवाडी शिव व रस्ता. तळयात जमीन संपादीत होताना स.क्र.६ मधील जमीन माझ्या नावावरती करण्यात आली होती. न्यायालयीन हुकूमनाम्याने ती जमीन माझ्या नावे झाली. हे खरे की, फेरफार क्र.३५६ प्रमाणे मी, माझे आई-वडील आणि बहिण-भाऊ वेगळे

झालो नव्हतो. हे खरे नाही की, त्यामुळे माझे वडील प्रभु अंतराम देपे यांनी फेरफार क्र.३५६ होण्यासाठी अर्ज करणे किंवा वाटणीपत्र दाखल करण्याची आवश्यकता नव्हती.

**५५.** डाळींब बागेत दोन रोपांमधील अंतर १० ते १२ फुट असते. अशी रोपे लावताना त्या क्षेत्रात चहुबाजूने काही जागा सोडावी लागते, हे खरे आहे. मी एका एकरात ४५० डाळींबाची रोपे लावली आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे स.क्र.६ व ८ मध्ये अंदाजे चार हजार झाडे आहेत. स.क्र.६ आणि ८ मधील आमच्या कुंटूंबाचे १ हेक्टर २९ आर क्षेत्र संपादीत झाले. स.क्र.६ आणि ८ मधील पश्चिम बाजूने दक्षिण-उत्तर चालीचा शिव रस्ता आहे, हे खरे आहे. कालव्याच्या संपादनात माझ्या कुंटूंबाची साधारण ११०० ते १२०० झाडे काढून टाकण्यात आली. वाद मिळकतीतील सगळया झाडांची लागण, निगा ही वादीने केली होती, हे म्हणणे खरे नाही. संपादीत क्षेत्राचा ताबा शासनाने सन २००६ मध्ये घेतला. स.क्र.६ आणि ८ मध्ये आमच्या कुंटूंबाच्या हिश्शाला आलेल्या मिळकतीत आम्ही डाळींब लावले होते, हे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, स.क्र.६, ८ आणि ९ मध्ये माझ्या हिश्शाच्या जमिनीला बागायती करण्यासाठी मला कुठलीही साधन-सामुग्री नव्हती. हे खरे नाही की, सरतपासातील मजकुर हा मी स्वेच्छेने काहीही घडले नसताना लिहिला आहे. सरतपासात लिहिलेला अ, ब, क मधील मजकूर खोटा आहे, हे खरे नाही. सरतपास परिच्छेद क्र.३ ते ८ मधील सगळा मजकूर खोटा आहे, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, हा दावा दाखल केल्यानंतर मी बनावटी कागदपत्रे तयार केली व याकामी दाखल केली. सरतपास परिच्छेद क्र.९ ते १६ मधील मजकुर चुकीचा व खोटा आहे, हे

विशेष दिवाणी दावा क्र.०९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
**प्रतिवादी क्रं. १ ते ५ तर्फे सा.क्र.१**
**(नि.क्र.४०७)**



खरे नाही. दावा मिळकतीत वादीने डाळींबानंतर कांदा पीक घेतले होते, हे खरे नाही. दावा मिळकतीतील डाळींबाची झाडे उपटून ती बांधाबाहेर काढण्यास वादीला खूप खर्च आला, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा असतानाही मी खरी म्हणून साक्ष देतो.

**५६.** वादीनी साक्ष यादीत नमूद केलेल्या साक्षीदारांची आणि माझी काही दुश्मनी नाही, हे खरे नाही. हे खरे नाही की, डाळींब पीकाची देखभाल निगा करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील लोक लातूर भागात येतात. डाळींब पीकाचे संरक्षण, निगा यासाठी प्रशिक्षण देवून त्याबद्दल प्रशस्ती पत्र दिले जाते याची मला माहिती नाही.

**साक्षीदार यादीवर प्रश्न विचारयचे असून साक्ष यादी प्रकरणामध्ये शोधण्यास वेळ लागत असल्याने प्रकरण तहकुब करण्यात आले.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक:१९/०८/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.